महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ ०४ जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३३६ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना

## मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई : राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. एकूण चार निर्णय घेण्यात आले. त्यापैकी आदिवासी विकास विभागातील एक निर्णय, महसूल विभागातील दोन निर्णय आणि सार्वजनिक बांधकाम विभागातील एक निर्णय घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे आता केंद्र सरकारच्या अनुसूचित जमाती आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात देखील अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्यात येणार आहे.**

सरकारने आदिवासी अनुसूचित जमाती आयोग मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळं समाजाला न्याय देण्याचं काम महायुती सरकारनं केलं आहे. केंद्र सरकारच्या अनुसूचित जमातीच्या धर्तीवर महाराष्ट्रात अनुसूचित जमाती स्वातंत्र्य आयोग स्थपान करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. या आयोगातून आदिवासी समाजातील प्रश्न, समस्या सोडवल्या जाणार असल्याची प्रतिक्रिया बैठकीनंतर आदिवासी मंत्री अशोक उईके यांनी माध्यमांना दिली. माझ्या खात्याला दहा टक्के निधी वाढून मिळाला आहे. खात्यातला निधी



कुठेही वर्ग केला नाही किंवा कमी झाला नाही, लाडक्या बहिणीला आपल्या खात्यातून निधी वर्ग केला का? असा प्रश्न अशोक उईके यांना विचारला असता त्यांनी यावर उत्तर दिलं.

### बैठकीतील 4 महत्त्वाचे निर्णय कोणते?

❍ महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना. आयोगासाठी पदनिर्मिती, जागा आणि अनुषंगिक खर्चास मान्यता. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग सुद्धा स्वतंत्रपणे कार्यरत राहणार

❍ धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दुग्ध व्यवसाय विकास विभागाची कुर्ला येथील ८.५ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्यासाठी करारनाम्यातील अटी, शर्तीमध्ये सुधारणांना मान्यता

❍ राज्य कामगार विमा महामंडळाच्या दोनशे खाटांच्या विमा कामगार रुग्णालय उभारणीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मौजे करोडी येथील सहा हेक्टर गायरान जमीन. याशिवाय बिबवेवाडी- पुणे, अहिल्यानगर, सांगली अमरावती, बल्लारपूर- चंद्रपूर, सिन्नर- नाशिक, बारामती, सातारा आणि पनवेल येथील रुग्णालयांना जमीन देण्यास तत्वतः मान्यता

❍ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास पथकराच्या सवलतीसाठी भरपाई मिळणार. मुंबई प्रवेशद्वाराच्या पाच पथकर स्थानकावर सवलत दिल्यामुळं महामंडळास द्यावी लागणारी भरपाई.

❍ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करणार : दुसरीकडं राज्यातील अवकाळी पावसामुळं ज्या शेतकऱ्यांचं नुकसान झालं आहे, त्याचे पंचनामे करून शेतकऱ्यांना कशी मदत करता येईल, याबाबत बैठकीत चर्चा झाली. लाडकी बहीण योजना कुठेही बंद होणार नाही, योजना चालू राहणार आहे. चार महिन्यापूर्वीच शासकीय महिलांनी जो लाभ घेतला आहे, ते जानेवारी महिन्यातच सरकारच्या निदर्शनास आलं होतं आणि तेव्हापासूनच त्यांचे पैसे बंद केले आहेत, असं मंत्री अदिती तटकरे यांनी सांगितलं.

### लाडक्या बहिणीचा हप्ता लवकरच देणार

**- मंत्री अदिती तटकरे**

मे महिन्याचा लाडक्या बहिणीचा हप्ता लवकरच खात्यात जमा होईल. शक्ती कायद्याचा प्रस्ताव मध्यंतरी पाठवला होता. परंतु त्याच्यामध्ये काही आता आमचे गृहमंत्री आहेत. त्यात काही कायदे किंवा काही त्रुटी असतील तर त्या ॲड करून, तो पुन्हा केंद्र सरकारकडं पाठवणार आहे", असं मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या.




# दोन टप्प्यात साजरी होणार हिरव्या देवाची यात्रा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** ग्रामीण भागात आणि विशेषतः आदिवासी, कातकरी समाजाची जीवनपद्धती, खाद्य संस्कृती, सोबतच रानभाज्या, त्या कशा दिसतात, त्या कशा बनवल्या जातात अशा सर्व गोष्टींची माहिती मिळवत संवाद साधण्यासाठी मुरबाड तालुक्यात हिरव्या देवाची यात्रा आयोजीत केली जाते. यंदा ५ जून रोजी मुरबाडच्या केवारवाडी आणि १५ जून रोजी मासले बेलवापाडा येथे दोन टप्प्यात हिरव्या देवाची यात्रा आयोजीत केली जाणार आहे. यंदाच्या यात्रेत स्थानिक बी बियाणे संकलन करणाऱ्या बांधवांशी संवाद साधण्याचा प्रमुख हेतू आहे. शहरातल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने या यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. शहरवासियांचे आणि विशेषतः तरूणांची निसर्गाशी नाते दुरावले आहे. त्यात आदिवासी आणि कातकऱ्यांच्या विश्वापासून कित्येक जण दूर आहेत. आदिवासी बांधवांनी वनोपजापासून तयार केलेली कलाकुसर, त्यांची खाद्यसंस्कृती, रानभाज्या, त्यांची बनवण्याची पद्धत, निसर्ग रांगोळी यांचा अनुभव घेता यावा. तसेच जंगल आणि पर्यावरणाविषयी असलेले ऋणानुबंध दृढ व्हावेत या संकल्पनेतून जागतिक वन दिनाचे औचित्य साधत मुरबाड तालुक्यातील आदिवासी भागात हिरव्या देवाची यात्रा आयोजित केली जाते.

# ठाणे मनपा साजरा करणार 'उत्सव वसुंधरे'चा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेतर्फे जागतिक पर्यावरण दिनाच्या (5 जून) निमित्ताने विविध उपक्रम आयोजित केले जातात. ठाणे महानगरपालिकेतर्फे पर्यावरण दिनाच्या निमित्ताने गुरुवार ५ जून ते रविवार ८ जून या काळात नौपाडा येथील गावदेवी मैदानात 'उत्सव वसुंधरेचा, संकल्प हरित ठाण्याचा' या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिक, विद्यार्थी, गृहसंकुलांचे पदाधिकारी, स्वयंसेवी संस्था यांच्यासाठी या उत्सवात प्रदर्शन, कार्यशाळा, स्पर्धा आणि परिसंवाद अशी अनोखी पर्वणी असणार आहे. पर्यावरणाविषयी जागृती करणाऱ्या या उपक्रमात ठाणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

पर्यावरणाविषयी जागृती करण्याबरोबरच, घरगुती कचऱ्याचे व्यवस्थापन, पर्यावरणपूरक जीवनशैली यांच्याविषयी उपलब्ध असलेले पर्याय नागरिकांना माहीत व्हावेत, यासाठी या उत्सवाचे आयोजन ठाणे महापालिकेतर्फे करण्यात येत आहे. 'शून्य कचरा आणि पर्यावरण प्रदर्शन २०२५' अशी या उत्सवाची संकल्पना आहे. त्यातील, पर्यावरण संवर्धन भव्य प्रदर्शनात पर्यावरणपूरक मूर्ती, सजावट, घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिकला पर्यायी वस्तू, सौर ऊर्जा, मलनि:सारण प्रकल्प, हवा सर्वेक्षण उपकरणे यांच्याशी निगडित दालने असतील. गुरूवार ५ जून रोजी या प्रदर्शनाचे उद्‌घाटन होणार आहे.


# कमकुवत पूल ; खड्ड्यांचे साम्राज्य

## समृद्धी महामार्गाची खुटघर - शहापूर एक्झिट असुरक्षित !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : नागपूर - मुंबई समृद्धी महामार्गाच्या अखेरच्या टप्प्याचा लोकार्पण सोहळा इगतपुरी येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ५ जून रोजी होतं असतानाच या समृद्धी महामार्गाची शहापूर एक्झिट असलेला खुटघर ते शहापूर येथील मुंबई - नाशिक जुना महामार्ग पर्यंतचा रस्ता पूर्णतः खड्ड्यात गेला आहे. या ३ किमी अंतरात असलेले भातसा नदी व आवरे नदीवरील पूल कुमकुमवत असल्याने महाड येथील सावत्री नदीसारखी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी नागपूर - मुंबई समृद्धी महामार्ग निर्माणाकरिता असतानाच महामार्गाचे एक्झिट असलेले रस्ते देखील आपल्या ताब्यात घेऊन तेथील रस्ते व पूल चांगल्या दर्जाचे करण्याचे योजले होते. त्यामुळे शहापूर ते मुरबाड असलेला रस्ता महामंडळाने आपल्या ताब्यात घेऊन हा रस्ता सिमेंटचा करण्यास ७ वर्षांपूर्वी सुरू केले होते.



**"सापगांव येथील भातसा नदीवरील पुलाचे संरक्षक कठडे वाहून गेले आहेत. रस्ते विकास महामंडळाने समृद्धी उद्घाटनाआधी या पुलावर संरक्षित उपाययोजना करणे गरजेचे आहे, अन्यथा महाड येथील सावित्री नदीवरील अपघाताची पुनरावृत्ती येथे घडण्याची शक्यता अधिक आहे."**
**■ गिरीष अंदाडे, माजी सरपंच, सापगांव**

मात्र ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे आतापर्यंत हा रस्ता पूर्णत्वास गेलेला नाही. समृद्धीची शहापूर एक्झिट असलेला खुटघर-दोऱ्याचा पाडा येथून शहापूरकडे येणार सिमेंटचा रस्ता जागोजागी अपुरा ठेवण्यात आलेला आहे, तर सापगांव येथील भातसा नदीवरील ब्रिटिशकालीन पूल हा अखेरच्या घटका मोजत असून नदीवरील दोन्ही बाजूला संरक्षक कठडे नाहीत.

पावसाळ्यात अनेक वेळा या मुंबईला पाणीपुरवठा करणारे भातसा धरण ओसंडून वाहू लागल्यानंतर भातसा नदीवरील ब्रिज पाण्याखाली गेल्याने शहापूरशी संपर्क तुटत असतो. याच रस्त्यावर शहापूरकडे येत असताना कांबारे पावर हाऊसजवळ असलेल्या आवरी नदीवरील पूल देखील असाच धोकादायक असून पाऊसकाळ्यात यावर देखील पाणी असल्याने अनेक वेळा वाहतूक बंद झालेली आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केली दहागांव , गोवेलीतील विकासकामांची पाहणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दि. 03 ठाणे - ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या नेतृत्वाखाली ता. कल्याण येथील दहागांव आणि गोवेली (ता. कल्याण) गावांमध्ये विविध विकास योजनांची व कामांची सविस्तर पाहणी करण्यात आली. या दौऱ्यात प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, गट विकास अधिकारी संजय भोये, सहाय्यक गट विकास अधिकारी (पं. स. कल्याण) रघुनाथ गवारी, विस्तार अधिकारी श्री. पराग भोसले, ग्रामविकास अधिकारी जी.आर. कुटेमाटे, वैद्यकीय अधिकारी डॉ. पुनम जयकर, तसेच इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.आरोग्य सेवा व घरकुल योजनेची पाहणी दहागांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट



देऊन वैद्यकीय सेवा, रुग्ण नोंदणी प्रक्रिया, औषध साठा व उपलब्ध मनुष्यबळ याचा आढावा घेण्यात आला. घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या घरी जाऊन घरकुलांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या वेळी ग्रामपंचायत माजी सरपंच अरविंद मिरकुटे यांनी स्थानिक पातळीवरील समस्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. त्यावर तात्काळ कार्यवाहीसाठी संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या. ग्रामपंचायत जागेची पाहणी व कामाच्या सूचना दहागांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीसाठी ग्रामपंचायतीच्या जागेची पाहणी करून तेथे जागे संदर्भात पुढील दोन दिवसांत आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी, अशा स्पष्ट सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी दिल्या.गोवेली येथील उपविभागीय पाणी तपासणी प्रयोगशाळेला भेट यानंतर गोवेली येथील उपविभागीय पाणी तपासणी प्रयोगशाळेला भेट देण्यात आली. प्रयोगशाळेतील कामकाजाची पाहणी करण्यात आली तसेच कामकाज वेळेत पुर्ण करण्यासाठी सुचना दिल्या.



# बदलापूरमध्ये टिओडी मिटरला विरोध आंदोलनकर्त्यांवर गुन्हे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : सक्तीने आणि कोणत्याही संमतीशिवाय बसवल्या जाणाऱ्या टीओडी मीटरविरोधात सोमवारी शहरातील महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी बदलापूर पूर्वेतील खरवईच्या महावितरण कार्यालयावर मोर्चा काढत आंदोलन केले. या आंदोलनाप्रकरणी आता आंदोलकांवर शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या आंदोलनानंतर महावितरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने आंदोलकांची मागणी मान्य करत सक्तीने आणि संमतीशिवाय मीटर बदलले जाणार नाही असे लेखी आश्वासन दिले आहे.

राज्यभरात महावितरणातर्फे टीओडी अर्थात टाईम ऑफ डे या तत्वावर आधारीत मीटर घरगुती ग्राहकांकडे बसवले जात आहेत. कल्याण परिमंडळात सव्वा दोन लाखांहून अधिक मीटर बदलून नविन मीटर लावण्यात आले आहेत. तर बदलापूर विभागातही सुमारे ४३ हजार मीटर बदलण्यात आले आहेत. मात्र या मीटरमुळे अवास्तव बिले आल्याची तक्रार काही ग्राहकांनी केली आहे. सोबतच हे मीटर बदलताना ग्राहकांची कोणतीही समंती तसेच संबंधित गृहसंकुलांना विश्वासात घेतले जात नसल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. त्यामुळे सोमवारी महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि काँग्रेस तसेच घटक पक्षांच्या वतीने बदलापूर पूर्वेतील खरवई महावितरण कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.

या मोर्चावेळी आंदोलकांनी परिसरात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच येथील कार्यकारी अभियंता आनंद काटकर यांची खुर्ची बाहेर आणून त्यावर गौतम अदानी यांचा फोटो लावत आंदोलन केले. याप्रकरणी कर्मचाऱ्याच्या वतीने दिलेल्या तक्रारीनंतर या सर्व आंदोलकांविरूद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप ठेवत बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात अविनाश देशमुख, हेमंत रूमणे, संजय जाधव, किशोर पाटील यांच्यासह विविध पदाधिकारी आणि ४० हून अधिक कार्यकर्त्यांचा समावेश आहे. शासकीय कामात अडथळा, वीज ग्राहकांना कामात अडथळा, दोन तास कामकाज बंद पाडणे असे आरोप आंदोलकांवर ठेवण्यात आले.

**अशा गुन्ह्यांनी आम्हाला काही फरक पडणार नाही. सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या घेऊन आम्ही आंदोलन केले. आमच्या आंदोलनानंतर महावितरणाच्या कार्यकारी अभियांत्यांनी आम्हाला लेखी आश्वासन दिले आहे. त्यामुळे आमचे आंदोलन सत्याला धरून होते.**
**- अविनाश देशमुख, प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्ष.**

# ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा शास्त्रज्ञांशी संवाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. ३** महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू) अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, ठाणे आणि मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित कृषी संकल्प अभियान २९ मे ते १२ जूनदरम्यान ठाणे जिल्ह्यातील सहा तालुक्यांमध्ये राबवले जात आहे. या अभियानात केवळ चार दिवसांत ३० गावांमधील शेतकऱ्यांशी शास्त्रज्ञांनी थेट संवाद साधला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शाश्वत शेती व दुग्ध व्यवसायाचे प्रत्यक्ष मार्गदर्शन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दिले जात आहे. या अभियानात नैसर्गिक शेती, मत्स्यपालन, शेळीपालन, कुक्कुटपालन, लसीकरण, खाद्य व आरोग्य व्यवस्थापन, म्हशींच्या पावसाळी हंगामातील देखभाल यावर भर देण्यात येत आहे. या अभियानादरम्यान कल्याण, भिवंडी, शहापूर व मुरबाड तालुक्यातील पोई, दाहगाव, कसाने, ताकीपाथर, मुरबाड, नांदगाव आदी ३० गावांना तज्ज्ञांनी भेटी दिल्या. प्रत्येक ठिकाणी ग्रामपंचायत कार्यालयात व गुगल फॉर्मद्वारे शेतकऱ्यांची माहिती नोंदवण्यात आली.

# विद्यार्थ्यांना आता पहिलीपासूनच सैनिकी शिक्षण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यात आता इयत्ता पहिलीपासूनच लष्कराचे बेसिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. राष्ट्रभक्तीची भावना लहान वयातच दृढ होण्यासाठी हे पाऊल टाकण्यात येत आहे. राज्यातील विद्यार्थ्यांना पहिलीपासूनच सैनिकी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. राष्ट्र प्रथम ही भावना रुजवण्यासाठी हे पाऊल टाकण्यात येत असल्याची माहिती समोर येत आहे. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नाशिकमध्ये एका जाहीर कार्यक्रमात याविषयीची घोषणा केली आहे. माजी सैनिक, क्रीडा शिक्षक, राष्ट्रीय कॅडेट कोर (एनसीसी) स्काऊट गाईड्स हे विद्यार्थ्यांना हे लष्करी प्रशिक्षण देतील. त्यासाठी राज्यातील 2.5 लाख माजी सैनिकांची मदत घेणार असल्याचे भुसे म्हणाले. याविषयीच्या प्रस्तावावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिल्याचे ते म्हणाले.









# गीतासार



### अध्याय १२
## भक्तियोगः

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते । श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥ १२-२० ॥

परंतु जे श्रद्धाळू पुरुष मत्परायण होऊन या वर सांगितलेल्या धर्ममय अमृताचे निष्काम प्रेमभावनेने सेवन करतात, ते भक्त मला अतिशय प्रिय आहेत. ॥ १२-२० ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगो नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील भक्तियोगः नावाचा हा बारावा अध्याय समाप्त झाला. ॥ १२ ॥

## रेसिपी
# दुधीचे थालिपीठ



साहित्य :

किसलेला दुधी ,ठेचलेली मिरची जिरे,तांदूळ पीठ,बटर,ठेचलेली लसूण आणि आलं पेस्ट, चवीपुरते मीठ

कृती :

किसलेल्या दुधीमधून पाणी काढून घ्या. त्यात तांदूळ पीठ, मीठ, जिरे, मिरची, आलं, लसूण पेस्ट मिक्स करून त्याचा गोळा बनवून घ्या. त्यावर तेल लावून नीट पीठ तयार करा. त्यानंतर एका प्लास्टिकच्या कागदावर गोळे बनवून थालिपीठीप्रमाणे थापा. तव्यावर बटर सोडून थालिपीठ भाजा. तुम्हाला हवं असल्यास, बटरच्या जागी तेलाचाही वापर करता येऊ शकतो. पण बटर असेल तर त्याची चव अधिक चांगली लागते.

## सौंदर्य टिप्स
# स्कीन फास्टिंग

ट्रेंडमध्ये असलेलं हे स्कीन फास्टिंग म्हणजे नेमकं काय आहे आणि ते कसं करावं असं तुमच्या मनात नक्कीच सुरू असेल. स्कीन फास्टिंग म्हणजे त्वचेला केमिकलयुक्त प्रॉडक्टपासून दूर ठेवायचं. कारण आजकाल बाजारात मिळणाऱ्या ब्युटी प्रॉडक्ट्समध्ये भरपूर केमिकल्स असतात. ज्यामुळे त्वचचं नुकसान होऊ शकतं. अचानक स्कीन केअर अथवा मेकअपचे प्रॉडक्ट वापरणं थांबवता येत नसलं तरी, हळू हळू तुम्हाला तुमच्या त्वचेवर असा ब्युटी प्रॉडक्टचा मारा करणं थांबवता येतं. यालाच स्कीन फास्टिंग असं म्हणतात. स्कीन फास्टिंग जमू लागल्यावर तुम्ही नैसर्गिक पद्धतीने अथवा घरगुती उपचार करून तुमच्या त्वचेची निगा राखायची असते. कारण नैसर्गिक घटकांपासून तयार केलेले स्कीन केअर अथवा घरगुती उपचार तुमच्या त्वचेची निगा तर राखताच पण त्यामुळे तुमच्या त्वचेच्या समस्यांही कमी होतात.

स्कीन फास्टिंग कसं करावं ?

आपल्याला नेहमी अनेक ब्युटी प्रॉडक्ट वापरण्याची सवय झालेली असते. त्यामुळे ब्युटी प्रॉडक्टशिवाय जगणंही आपण सहन करू शकत नाही. पण जर ते ब्युटी प्रॉडक्ट तुमच्या त्वचेवर दुष्परिणाम करत असतील तर त्यापासून दूर राहणं हाच उत्तम उपाय आहे. यासाठी अचानक ब्युटी प्रॉडक्ट वापरणं सोडू नका. नाहीतर तुमची त्वचा लगेच निस्तेज आणि कोरडी पडेल. हळू हळू ब्युटी प्रॉडक्ट्स वापरणं सोडायचा प्रयत्न करा. या दरम्यान तुम्ही वेगन, केमिकल फ्री, आयुर्वेदिक, क्रुअल्टी फ्री प्रॉडक्ट्स नक्कीच वापरू शकता. त्यानंतर त्वचेची निगा राखण्यासाठी भरपूर पाणी प्या आणि नैसर्गिक उपाय करणे सुरू करा.

# कल्याण स्टेशन परिसरातील समस्या : राणी कपोते यांचे उपोषण

## अनैतिक धंदे, वेश्याव्यवसाय, वाहतूक कोंडी, अस्वच्छतेमुळे नागरिक त्रस्त

## राणी कपोते यांनी राबवली सह्यांची मोहीम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात सुरु असणारे अनैतिक धंदे, वेश्याव्यवसाय, वाहतूक कोंडी, अस्वच्छतेमुळे नागरिक त्रस्त असून नागरिकांना भेडसावणार्या या समस्यांना वाचा फोडण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्या राणी कपोते यांनी स्टेशन जवळ असलेल्या वाहनतळा बाहेर सह्यांची मोहिम राबवली असून त्या बेमुदत उपोषणाला देखिल बसल्या आहेत.

ऐतिहासिक कल्याण शहराच्या सर्वांगीण विकास हाच ध्यास घेऊन कल्याण रेल्वे स्टेशन व कल्याण रेल्वे स्टेशन परिसरातील व स्काय वॉक वरील अस्वच्छता व दुर्गंधी, अनैतीक धंदे (वेश्या व्यवसाय, मटका, जुगार, सट्टा, चरसी, गरदुल्ले, आमली पदार्थ, ड्रग्स, एमडी पावडर सेवन व विक्री, फेरीवाले, परिसरातील वाहतुक कोंडी, परिसरातील व शहरातील अत्यंत धीम्या गतीने सुरु असलेली विकास कामे, पार्कंग समस्या तसेच स्काय वॉक वरील व परिसरातील सीसी टीव्ही, पब्लिक अनाऊंसमेंट सिस्टम तसेच इतर गंभीर विषयांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी राणी कपोते यांनी बेमुदत उपोषण सुरु केले आहे. त्यांच्या या उपोषणाला अनेक सामाजिक संस्थांचा पाठींबा मिळत असून नागरिकांचा देखील उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# कल्याण पश्चिमेत नागरी संरक्षण प्रशिक्षण शिबीर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सध्या देशातील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नागरी संरक्षण संघटनेत स्वयंसेवकांची संख्या वाढविण्याचे प्रयत्न वेगाने सुरू आहेत. 'Defence Warriors' या ॲप आणि संकेतस्थळाच्या माध्यमातून देशभरातून स्वयंसेवकांची मोठ्या प्रमाणावर नोंदणी होत आहे. या मोहिमेचा भाग म्हणून, डॉ. प्रकाश कांतीलाल ठमके (मानसेवी निदेशक, नागरी संरक्षण) यांच्या पुढाकाराने दिनांक २७ मे ते ३१ मे २०२५ या कालावधीत नागरी संरक्षण मूलभूत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे प्रशिक्षण किसान सहकारी गृहनिर्माण संस्था, KDMC गार्डनजवळ, म. फुले चौक पोलिस स्टेशन मागे, प्रेम ऑटो जवळ, कल्याण (प.) येथे घेण्यात आले. शिबिरात विविध वयोगटांतील २३ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेऊन यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केले.

या शिबिरात प्रशिक्षणार्थींना नागरी संरक्षण दलाची कार्यपद्धती, समाजातील नागरी संरक्षण संघटनेची भूमिका, आपत्ती प्रकार व त्यांचे व्यवस्थापन, प्रथमोपचार, बचाव कार्य, नियंत्रण व संप्रेषण, अग्निशमन अशा विविध विषयांवर तज्ञ मार्गदर्शकांनी सैद्धांतिक व प्रात्यक्षिक स्वरूपात सखोल माहिती दिली. सर्व प्रशिक्षणार्थींनी या शिबिराबद्दल समाधान व्यक्त केले असून, राष्ट्रसेवेची ही अनोखी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले.

या प्रशिक्षणाचे संचालन सहाय्यक उपनियंत्रक श्री. अनिल गावित यांनी केले. त्यांना उपमुख्य क्षेत्ररक्षक श्री. बिमल नथवाणी, डॉ. राहुल घाटवळ, श्री. हनुमान चौधरी, सौ. शकुंतला राय, श्री. संजय मगर आणि डॉ. प्रकाश ठमके यांनी अध्यापनात सहकार्य केले. शिबिराच्या अंतिम दिवशी म्हणजेच ३१ मे २०२५ रोजी लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आली. यानंतर ना. सं. नवी मुंबई समूह, ठाणे येथील मा. उपनियंत्रक श्री. विजय जाधव यांनी उपस्थितांना नागरी संरक्षणाची शपथ दिली व त्याचे महत्त्व विशद केले.

शिबिर यशस्वी होण्यामध्ये SG Education च्या संचालिका सौ. कोमल घावट यांचेही मोलाचे योगदान लाभले. त्यांनी वर्गखोली विनामोबदला उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजकांकडून त्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

## केडीएमसीच्या 'अ' प्रभागातील
# अनधिकृत बांधकामांवर कारवाई



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार, उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली अ प्रभागाचे सहा.आयुक्त प्रमोद पाटील यांनी आज सकाळ पासून नांदप रोड टिटवाळा येथे सुरू असलेले २ रूमचे बांधकाम, तसेच नांदप रोड येथील १ रूम व शांताबाई नगर गाळेगाव येथील २ रूमचे अनाधिकृत बांधकाम असे एकूण ५ रूमच्या बांधकामांवर निष्कासनाची कारवाई केली. हि कारवाई महापालिका पोलीस अधिकारी व कर्मचारी, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे कर्मचारी यांच्या मदतीने आणि १ जेसीबी व १० मजूर यांच्या सहाय्याने करण्यात आली.

# वीज सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अशोक बामगुडे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेच्या अधिपत्याखालील वीज कर्मचारी सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, जिल्हा. ठाणे पालघर, कल्याणच्या अध्यक्षपदी कॉम्रेड अशोक बामगुडे आणि उपाध्यक्षपदी कॉम्रेड जगदीश म्हात्रे यांची निवड विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था सहकार विभाग नवी मुंबई तनवीर पाटील यांच्या उपस्थितीत झाली. याप्रसंगी वर्कर्स फेडरेशन संघटनेचे राज्य संयुक्त सचिव कॉम्रेड औदुंबर कोकरे, वाशी पारेषण झोनचे सचिव आणि पतसंस्थेचे सल्लागार कॉम्रेड दिलीप पाटील, कल्याण झोनचे सचिव कॉम्रेड संतोष चचाने तसेच सर्व संचालक वर्ग उपस्थित होता. अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवड सर्वानुमते अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

## माजी नगरसेविका
# कविता म्हात्रे यांचा वाढदिवस संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली(शरद शहाणे) : राजू नगर डोंबिवली पश्चिम येथील भाजपा च्या माजी नगरसेविका सौ कविता गजानन म्हात्रे यांचा वाढदिवस एक जून रोजी तर माजी नगरसेवक विकास गजानन म्हात्रे यांचा वाढदिवस दिनांक 3 जून रोजी साजरा करतात.

श्री आणि सौ म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या प्रभागात एक आगळावेगळा कार्यक्रम संपन्न झाला दोन्ही प्रभागातील नागरिकांकरिता कलर स्मार्ट टीव्ही, वॉटर फिल्टर, आणि सायकल या वस्तू 50% सवलतीच्या दरात नागरिकांना उपलब्ध करून देत आहेत त्यामुळे प्रभागातील नागरिकांनी याचा मोठ्या प्रमाणावर फायदा घेत सौ कविता विकास मात्रे आणि श्री विकास गजानन म्हात्रे यांना मनापासून अनेक शुभ आशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्या.

श्री आणि सौ म्हात्रे हे दोघेही प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडवताय आणि अडचणीला, सुखदुःखात नेहमीच धावून जातात आणि मदत करतात.

म्हात्रे यांच्या वाढदिवसाला शुभेच्छा देण्यासाठी राजकीय , सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील हितचिंतकांनी हजेरी लावली होती.

# सरळगाव नाक्यावर वाहतुकीची कोंडी

## ग्रामपंचायतीच्या पत्रांना केराची टोपली!

### रस्त्यावरील विक्रेत्यांमुळे वाहतुकीचा होतोय खोळंबा!



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(दिलीप पवार) : मुरबाड -माळशेज रस्त्यावरील सरळगाव बाजारपेठेत रोजच रहदारी जाम होत असल्याने प्रवाशी व नागरीक त्रस्त होत आहेत. ग्रामपंचायत पत्रव्यवहार करीत असूनही पोलीस यंत्रणेचे जाणून बुजून दुर्लक्ष होत असल्याने रहदारीची समस्या सुटता सुटत नाही.

मुरबाड माळशेज रस्त्यावरील शहापूर तालुक्याला जोडलेली तालुक्यातील सरळगाव ही मोठी बाजारपेठ आहे. दर मंगळवारी या ठिकाणी गुरांचा, भाजीपाला, कपडा व संसारोपयोगी वस्तूंचा आठवडी बाजार भरत असतो. या बाजारात जुन्नर, ओतूर, आळेफाटा, नारायणगाव येथून व्यापारी येत असतात. आजूबाजूच्या शेतकऱ्यांना व भाजी विक्रेत्यांना आपला शेती माल विकण्यासाठी ही बाजारपेठ अत्यंत सोयीची वाटते. त्यासाठी सरळगाव रोहिदास वाड्याच्या बाजूला लाखो रुपयांचा खर्च करून मार्केट यार्ड बांधलेले आहे. तरीही ग्रामपंचायतीच्या नियमांना फाट्यावर मारून सर्व विक्रेते आपली दुकाने थाटून रस्त्यावरच बसत आहेत. दररोज ट्रॅफिक जाम होत असतानाही चौकीतील पोलिस कर्मचारी मात्र पोलिस चौकी सोडून बाहेर येण्याची तसदी घेत नाहीत. रोडमार्जीनच्या आत हे विक्रेते बसत असूनही रस्ते विकास विभागाचे दुर्लक्ष होत आहे. राज्य परिवहन विभाग सुद्धा या गंभीर बाबींबाबत डोळयावर झापडे ओढून बसले आहे. सरळगावच्या आठवडी बाजारच्या दिवशी शहापूर, मुरबाड तालुक्यातील आजूबाजूच्या साठ सत्तर गावच्या ग्राहकांची प्रचंड गर्दी होत असते. सणासुदीच्या व सुगीच्या दिवसात अन्य दिवशीही मोठ्या प्रमाणात ग्राहकांची वर्दळ सुरू असते. रस्त्याच्या कडेलाच दुकाने, मालाचे टेम्पो, ताडपत्री शेड, प्रवाशी जीप रस्त्याच्या कडेलाच लावत असल्याने सर्व गिऱ्हाईक अर्धा रोड व्यापून चालत असतात. मुश्किलीने एखादे वाहन निघू शकेल इतकीच जागा मुरबाड-माळशेज सारख्या रहदारीच्या रस्त्यावर राहत असते. त्यामुळे मुंगीच्या वेगाने वाहने चालत असल्याने प्रवाशांचा प्रचंड खोळंबा होत असतो. याबाबत ग्रामपंचायतीच्या माध्यमातून मुरबाड पोलिस ठाण्यात विनंती अर्ज केले आहेत. तात्पुरते दोन दिवस पोलिस कर्मचारी दिसला. त्यानंतर पोलिसांचे पुन्हा दुर्लक्ष झाल्याने सरळगाव ट्रॅफिक समस्या जशी आहे तशीच झाली आहे. हा भाजीपाला मार्केट रोहिदास वाडा येथे बांधलेल्या मार्केट यार्ड मध्ये नेल्यास रस्त्यावरील ट्रॅफिकची समस्या दूर होईल हे नागरिक वारंवार ग्रामपंचायतला सुचवत असूनही ग्रामपंचायत ठोस निर्णय घेत नाही. त्यामुळे रहदारीच्या या समस्येचा प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. संबंधीत ग्रामपंचायत, रस्ते विकास, राज्य परिवहन, अपघात प्रतिबंधक, विभागाच्या अधिकाऱ्यांनी वेळीच सावध होऊन उपाययोजना केली नाही तर एखाद्या दिवशी मोठ्या वाहनाचा ब्रेक फेल झाल्यास फार मोठी जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशी घटना घडल्यास जबाबदार कोण असणार?

> भाजीपाला विक्रेते मार्केट यार्डमध्ये जायला तयार नाहीत. पोलिसांनाही यापूर्वी पत्रव्यवहार केला आहे. मी आता सेवानिवृत्त होत आहे. नवीन येणाऱ्या ग्रामसेवकांच्या कानावर हा विषय टाकतो.
> – पी एस कापसे, ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, सरळगाव

> सरळगाव ट्रॅफिक जाम मुळे प्रवासात प्रचंड खोळंबा होत आहे. कधी कधी ड्युटीवर उशिरा जावे लागते. मार्केट बाजूला नेला तरच ही समस्या सुटेल.
> – परेश घुडे, नागरीक.

# ग्रीन मॅरेथॉनव्दारे पर्यावरण संवर्धनाचा प्रचार




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून डी.वाय.पाटील क्लायमेट ॲक्शन लॅबच्या वतीने आयोजित 'ग्रीन मॅरेथॉन : रन फॉर द प्लॅनेट' या पर्यावरणपूरक उपक्रमात नवी मुंबई महानगरपालिकेने आयोजन सहभाग घेत हा उपक्रम यशस्वी केला. महानगरपालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षीच्या 'जागतिक स्तरावर प्लास्टिक कच-याचे निर्मूलन' या जागतिक पर्यावरणदिनाच्या संकल्पेनेला अनुसरून पर्यावरण सप्ताह साजरा केला जात आहे. या अंतर्गत नानाविध उपक्रमांचे आयोजन केले जात असून त्यामध्ये लोकसहभागावर भर दिला जात आहे. त्याचप्रमाणे विविध संस्थांमार्फत आयोजित पर्यावरणशील उपक्रमांतही महानगरपालिका सहभागी होत आहे.

आज डॉ.डी.वाय.पाटील समुहाचे अध्यक्ष श्री.विजय पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार डी.वाय. पाटील क्लायमेट ॲक्शन लॅबमार्फत डॉ.डी.वाय.पाटील स्टेडिअमपासून सुरू झालेल्या व नेरूळ पूर्व परिसरात निश्चित केलेल्या मार्गाने पुन्हा स्टेडिअमजवळ सांगता झालेल्या 5 किमी. अंतराच्या ग्रीन मॅरेथॉनमध्ये युवक, युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महानगरपालिकेच्या वतीने उद्यान विभागाचे उपआयुक्त श्री.किसनराव पलांडे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपआयुक्त श्रीम.अभिलाषा म्हात्रे, विजय पाटील स्कुल ऑफ मॅनेजमेंटच्या कॉर्पोरेट रिलेशन मॅनेजर डॉ.विद्या श्रीनिवास यांनी झेंडा दाखवून ग्रीन मॅरेथॉनचा शुभारंभ केला. नेरूळ विभागाचे सहा. आयुक्त श्री. जयंत जावडेकर यांनी ग्रीन मॅरेथॉनमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला होता.

'पर्यावरण विघातक प्लास्टिकला नकार आणि कापडी पिशव्यांचा करू स्विकार', 'से नो टू प्लास्टिक', 'प्लास्टिकचा वापर टाळूया – पर्यावरण जपूया' अशा घोषवाक्यांचे फलक उंचावत या ग्रीन मॅरेथॉनमध्ये 200 हून अधिक नागरिक सहभागी झाले होते. यामध्ये युवक-युवतींची संख्या लक्षणीय होती. या ग्रीन मॅरेथॉनमधील विजेत्यांना सन्मानचिन्हे व मेडल्स देऊन गौरविण्यात आले. या माध्यमातून शाश्वत पर्यावरण विकासासाठी एक यशस्वी धाव घेण्यात आली.







## आजचे राशिभविष्य



**मेष**

तुमची काही कामे थांबलेली होती ती पूर्ण होतील. धार्मिक प्रवासाचा योजना आखणार आहात पण काही कारणामुळे ही यात्रा पुढे ढकलावी लागेल.

**वृषभ**

मंगलकार्यासाठी तुम्ही खर्च करणार आहात. तुमची सरकारी कामे काही कारणामुळे रखडलेली होती ती आता सुरळीतपणे मार्गी लागणार आहेत. करिअर

**मिथुन**

तसेच व्यवसायात चांगल्या संधी तुमच्या आसपास आहेत त्याचा लाभ घ्या.जोखीम असणारे काम घेवू नका. उधारी मागेल तर देवू नका.

**कर्क**

आर्थिक स्थिती ठिक असली तरी पैसे जपून वापरा आणि बचत करण्याचा प्रयत्न करा.व्यवसायात तुमची प्रगती असून कर्मचाऱ्यांकडे लक्ष ठेवा.

**सिंह**

तुम्ही स्वतः कामात फोकस ठेवा यामुळे कामे वेळेत मार्गी लागतील. अनेक दिवसांपासून सुरू असलेला ताण आज काहीसा कमी होईल.

**कन्या**

घरासंदर्भातील मालमत्तेचा काही वाद कोर्ट-कचेरीमध्ये सुरु असेल तर त्यामध्ये निकाल तुमच्या बाजूने असेल.करिअरमध्ये प्रगती आहे.

**तूळ**

ऑफिसमध्ये तुम्हाला जे काही बोलायचे आहे ते स्पष्ट बोला, त्यामुळे समस्या कमी होतील. संध्याकाळी कुटुंबासोबत मंगलकार्यात सहभागी होणार आहात.

**वृश्चिक**

प्रियजनांच्या भेटीमुळे ताणतणाव कमी होईल. अपेक्षित धनलाभ झाल्याने मनोबल वाढेल. तुम्ही करिअरसाठी उपयोगी पडेल असे शिक्षण घ्या.

**धनु**

घरी वातावरण समाधानी असून सगळेजण तुम्हाला कामात मदत करण्यासाठी तयार राहतील. रखडलेली महत्त्वाची कामे मार्गी लागतील.

**मकर**

तुम्ही स्वतःसाठी वेळ काढणार असून काही खरेदी देखील करणार आहेत. जे लोक व्यवसायात आहेत त्यांच्यासाठी बिझनेस ट्रिप महत्त्वाची असेल.

**कुंभ**

तुमच्या कामातील निष्काळजीपणा मोठं नुकसान करु शकतो. काम करताना सतर्क राहा. निरर्थक वाद तुमच्यासाठी अडचणी निर्माण करु शकतात .

**मीन**

भांडणापासून दूर राहा. खूप धावपळ झाल्यामुळे तब्येतीवर परिणाम होवू शकतो तुम्ही आहार आणि आरामाकडे लक्ष द्या.



# नाशिकच्या पर्यटन कंपनीकडून कल्याणमधील पर्यटकांची लूट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. ३ (वार्ताहर):** शहरातील ५८ पर्यटकांना फिरण्यासाठी थंड हवेच्या ठिकाणी घेऊन जातो, असे आश्वासन देऊन पर्यटकांकडून सात लाख ४६ हजार ५०० रुपये घेतले; मात्र त्यानंतर दिलेल्या तारखेच्या दिवशी पर्यटनासाठी घेऊन गेलेच नाहीत. नाशिक येथील पर्यटन कंपनीच्या एकाच कुटुंबातील वडील, मुलगा आणि त्याची पत्नी यांनी ५८ पर्यटकांची आर्थिक फसवणूक केली.

कल्याण पश्चिमेतील संतोषी माता रस्त्यावर रामबाग गल्लीत या पर्यटन कंपनीचे कार्यालय आहे. या पर्यटन कंपनीचे तीन संचालक नाशिक येथे उपप्रादेशिक कार्यालय परिसरात वासंती व्यापारी संकुल भागात राहतात. या प्रकरणात फसवणूक झालेल्या सेवानिवृत्त महिलेने महात्मा फुले पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. कल्याणमधील एकूण ५७ पर्यटक शिमला, अंदमान, निकोबार, सिंगापूर येथे फिरण्यासाठी जाणार होते. यासंदर्भात कल्याण पश्चिमेतील संतोषी माता रस्त्यावरील नाशिक येथील पर्यटन कंपनीची शाखा असलेल्या कार्यालयात चौकशी केली. त्या वेळी तेथील संचालकांनी प्रस्तावित केलेल्या ठिकाणी पर्यटनासाठी घेऊन जातो, असे आश्वस्त केले. त्यानंतर पर्यटकांना कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या दिलेल्या क्रमांकावर संपर्क करण्यास सांगून त्यांच्या बँक खात्यावर सात लाख ४६ हजार ५०० रुपयांचा भरणा करण्यास सांगितले. तसेच पर्यटनाच्यावेळी बस प्रवासासाठी एक लाख रुपये भरणा करण्यास पर्यटकांना सांगितले.

पर्यटनाची तारीख जवळ आल्यावर पर्यटकांनी सिमला, अंदमान, निकोबार, सिंगापूर येथे जाण्याची तयारी केली. पर्यटकांनी पर्यटन कंपनीकडे पर्यटनाला निघण्याच्या वेळेबाबत विचारणा केली. तेव्हा त्यांना धक्का बसला. पर्यटनाच्या ठरलेल्या तारखेस पर्यटकांना घेऊन जाण्यास पर्यटन कंपनीने असमर्थता व्यक्त केली. यामुळे पर्यटकांचा हिरमोड झाला. पर्यटनासाठी घेऊन जाणार नसाल, तर आमचे भरणा केलेले पैसे परत करा, असा तगादा पर्यटकांनी पर्यटन कंपनी संचालकांच्या मागे लावला. त्याला प्रतिसाद न मिळाल्याने अखेर फसवणूक झालेल्या पर्यटकांनी महात्मा फुले पोलिस ठाण्यात पर्यटन कंपनी संचालकांविरुद्ध आर्थिक फसवणुकीची तक्रार केली. पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करून घेतला आहे. पोलिस उपनिरीक्षक प्रतिभा माळी तपास करत आहेत.

# वासिंदमध्ये पाचशेहून अधिक नागरिकांना श्वानदंश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**शहापूर, ता. ३ (वार्ताहर) :** तालुक्यातील वासिंद शहरात तब्बल ६०१ जणांना श्वानदंश झाल्याची माहिती समोर आली आहे. डिसेंबर २०२४ ते मे २०२५ या सहा महिन्यांच्या कालावधीत ६०१ जणांना भटक्या श्वानांनी चावा घेऊन जखमी केले आहे.

वासिंद येथील मनसेचे शहराध्यक्ष अमोल बोराडे यांनी शहरातील भटक्या श्वानांचा उपद्रव वाढल्याने व आतापर्यंत तब्बल ६०१ जणांना या श्वानांनी चावा घेतल्याने भटक्या श्वानांचा उपद्रव रोखण्याची मागणी शहापूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी नम्रता जगताप यांच्याकडे केली होती. गटविकास अधिकाऱ्यांनी याबाबत दखल घेऊन सोमवारी (ता. २) विशेष बैठकीचे आयोजन केले होते. यामध्ये त्यांनी उपाययोजना आखण्याचे निर्देश स्थानिक प्राधिकरण म्हणून ग्रामपंचायतीला दिले आहेत.

अमोल बोराडे यांनी वासिंद प्राथमिक आरोग्य केंद्राकडे श्वानदंशाच्या रुग्णांच्या संख्येची आकडेवारी मागितली होती. या माहितीत डिसेंबर २०२४ या महिन्यात ६८ श्वानदंशाचे रुग्ण आढळले आहेत, तर २०२५ या वर्षातील जानेवारी महिन्यात ९९, फेब्रुवारी महिन्यात १०४, मार्च महिन्यात १०६, एप्रिल महिन्यात १२८ तर मे महिन्यात ९६ जणांना श्वानदंश झाल्याची बाब समोर आली आहे.

## मनसेकडून आंदोलनाचा इशारा

**अवघ्या सहा महिन्यांत तब्बल ६०१ जणांना श्वानदंश होऊनही ग्रामपंचायतीने उपाययोजना न आखल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर पसरला आहे, तर येत्या १५ दिवसांत कार्यवाही न झाल्यास आंदोलनाचा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला आहे.**

# खतांच्या किंमती गगनाला
## शहापुरातील शेतकरी चिंताग्रस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर, ता. ३ (वार्ताहर) :** खरीप हंगाम २१ दिवसांवर आल्याने शेतीच्या मशागतीचे कामे सुरू झाली आहेत. शेतकऱ्यांनी पेरणीचे नियोजन सुरू केले असताना सबसिडीत कपात झाल्याने रासायनिक खतांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे पेरणीसाठीचा खर्च वाढण्याची चिन्हे आहेत.

शहापूर तालुक्यात खरिपात भात, नागळी, वरई ही प्रमुख पिके घेतली जातात. या पिकांना जोडपिके म्हणून वांगी, मिरची, भेंडी भाजीपाला आणि विविध जातीच्या कडधान्याची पिके घेतली जातात. तालुक्याच्या कोरडवाहू पठार भागात नागळी व वरई हे नगदी पीक आहे. त्यासाठी खतांचा वापर होतो, परंतु यंदा



बियाण्यांच्या किमती आधीच वाढल्या असताना खतांचे दरही वाढले आहेत. सरकारने खतांवरील सबसिडी कमी केल्याने उत्पादन खर्चही वाढला आहे. त्यामुळे खतांचे दर वाढल्याने त्याचा फटका शेतकऱ्यांच्या खिशाला बसणार आहे.

### ■ फार्मर आयडी अनिवार्य

शेतकऱ्यांना खत खरेदी करताना फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. विक्रेत्यांकडील पॉस मशीनवर अंगठा देऊनच खते मिळणार आहेत. त्यानंतरच सबसिडी मिळणार आहे.

### ■ किमतीतील दरवाढ

१०:२६:२६ या खताची किंमत १,४७० रुपयांवरून १,७२० रुपये झाली आहे. म्हणजेच तब्बल २५० रुपयांची वाढ झाली आहे. १२:३२:११ या खताची किंमत १,४७० रुपयांवरून १,७५० रुपये झाली आहे. २४:२४:०० या खताची किंमत १,७०० रुपयांवरून १,८५० रुपये झाली आहे. १८:१८:१०, २०:२०:००, १९:१९:१९ या खतांच्या किमतीतही प्रत्येकी १०० रुपयांची दरवाढ झाली आहे.

# महावितरणचा निष्काळजीपणा
## विजेच्या धक्क्याने मेंढ्यांचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नालासोपारा, ता. ३ (बातमीदार):** महावितरणच्या निष्काळजी कारभाराचा फटका पुन्हा एकदा वसईतील मुक्या प्राण्यांना बसला आहे. देवतलाव येथील मुख्य रस्त्यालगत महावितरणची वायर सोमवारी (ता. २) दुपारी तुटून खाली पडल्याने दोन मेंढ्यांना विजेचा धक्का लागून त्यांचा जागीच मृत्य, तर एक मेंढी गंभीर जखमी आहे. स्थानिकांनी वेळीच मदत केल्याने तिचा जीव वाचवण्यात यश आले.

वसईच्या मर्सेस गावात २४ मे रोजी गवत कापताना चालू वायर गवतावर पडल्याने सुजीत कुमार याचा मृत्यू झाला होता. ३० मे रोजी विरारच्या अर्नाळा वटार येथील धसपाडा भागात महावितरणचा कर्मचारी जयेश घरत याला विजेचा धक्का लागून मृत्यू झाला, तर तीन कर्मचारी गंभीर जखमी झाले होते. आता दोन मेंढ्यांचा मृत्यू झाला. ही घटना गजबजलेल्या देवतलाव रस्त्यालगत घडली असून, या ठिकाणी रिक्षा स्टँड आणि शाळा आहे. शाळेला सुट्टी असल्याने मोठी दुर्घटना टळली, मात्र या अपघातामुळे पुन्हा एकदा महावितरणच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### अमृत योजनेच्या कामासाठी केलेल्या
# खोदकामामुळे मांडा टिटवाळा वासुन्द्री रस्त्याची दुरावस्था

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मांडा टिटवाला रोडवर गेल्या 2023 म्हणजे 2 वर्षा पूर्वी जे खोदकाम सुरु आहे ते काम अजुनही पूर्ण न केल्यामुळे येथील स्थानिक गावकरी व रहिवासी यांना तसेच वाहन चालक यांना खूप कठिन प्रसंगाला तोड़ द्यावे लागत असुन,येथून अनेक राजकिय नेते व पदाधिकारी यांच्या गाड्या जात येत आहेत, परंतु केवळ जाहिरात करणाऱ्याना मात्र या गंभीर समस्या आहे तिला वाचा फोड़न्यासाठी त्यांना वेळ नाही, यासाठी येथील साईभक्त व जागरूक नागरिक श्री राम भोईर यांनी याबाबत संबंधित अधिकारी यांना सतत लेखी तक्रारी केल्या असुन, दैनिक भास्कर यांनी आचार्य अत्रे नाट्यगृह येथे आयोजित केलेल्या जनता दरबार जन मंच मधे देखील याबाबत उपायुक्त वंदना गुलवे यांच्या समोर याबाबत तक्रार केली होती तरीही पहिल्या पावसात ह्या रस्त्याची दुर्दशा झाली असुन नागरिकांना रस्त्यावरुन चालन देखील कठिन झाले असुन,या रसत्याचे काम लवकरात लवकर हाती घेतले नाही तर ग्रामस्थ मंडळ मांडा यांच्या वतीने लवकरच महानगर पालिकेवर एक विशाल मोर्चा चे आयोजन करण्यात येणार आहे, असे निवेदन श्री राम भोईर यांच्या पुढाकाराने महानगर पालिका आयुक्त मा श्री अभिनव गोयल यांची भेट घेऊन देणार आहेत**

# दहा जूनपर्यंत पेरणीची घाई नको !
## मुरबाड तहसिलदारांचे शेतकऱ्यांना आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शेतकऱ्यांनी १० जूनपर्यंत पेरणीची घाई करू नयेमुरबाड तहसिलदारांचे शेतकरी बंदू ना आवाहन;हवामान खात्याच्या सुचने नुसार मान्सूनचा प्रवास रखडला, मुरबाड : दि ४ ६ मे पासून आजपावेतो गेल्या महिणा भर पावसाने धुमशान घातले आहे, गेले तीन दिवस सुर्यदर्शन झाले असले तरी बदललेल्या वातावरणामुळेमासूनच्या प्रवासाची गती कमी होण्यास सुरुवात झाली असल्याने हवामान खात्याच्या अंदाजा नुसार मान्सूनचा प्रवास पूर्णपणे रखडला आहे. त्यामुळे १० जूनपर्यंत पेरण्यांची घाई करू, नये असे आवाहन कर्तव्यदक्ष तहसिलदार अभिजित देशमुख यांनी शेतकरी बांधवाना केले आहे.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्याला भाताच कोठार असे म्हटले जाते येथील ९०%जनजिवन हे पावसाळ्यातील भातपिकावर अवलंबून आहे, येथील गावखेड्या पाड्यावरील उत्पनाचे मुख्य साधन म्हणजे भातपिक असून जून महिण्यात पेरणी केल्यावर 120 दिवसात भातपिक तयार होते,तयार झालेली पिक देखील लहरी निसर्गामुळे दरसाल धोक्यात येऊ लागले आहे, अवेळी पावसाचा फटका हा पेरणी वेळी बसला नाही तर भात तयार झाल्यावर बसून येतोच त्या मुळे शेती व्यवसायाला घरघर लागली असतानाच कधी नव्हे ते या वर्षाच्या मे महिण्यात उकाड्याच्या दिवसात नदिनाले भरून वाहू लागले आहेत, महिणाभर बसलेला पाऊस किमान १० जूनपर्यंत तरी मासूनचा प्रवास थांबणार असल्याचा अंदाज असल्या आहे, पेरणी केल्यास पाऊसा अभावी वाफे तयार होणार नसल्याने 10 जून नंतरच पेरणी करायला हवी आणि राज्यातील काही भागात प्रामुख्याने हलका पाऊस पडण्याचा अंदाज असला तरी कोरडे हवामान अपेक्षित आहे, ज्यामुळे कमाल तापमानात वाढ होईल. या कोरड्या हवामानाचा वाईट परिणाम पेरणी आणि लागवडीवर होण्याची शक्यता आहे. कोणत्याही अफवावर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये तसेच कृषी विभागाचे सल्ल्यानुसार पुढील दिशा ठरवावी असे आवाहन देशमुख यांनी शेतकरी वर्गाला केले आहे.

# वसई विरार मनपाचा शिक्षणकर वादातीत !
## पालिकेची एकही शाळा नसताना शिक्षणकर वसुलीचा ठपका



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**विरार :** वसई विरार महानगरपालिका शेटार्ट पालिकेची एकही शाळा नसताना पालिका मात्र घरपट्टी बरोबर शिक्षण कर हि गोळा करत आहे. २०११ ते २०२५ पर्यंत ३०० कोटीच्या वर शिक्षण कर वसूल झाल्याचे माहिती अधिकारातून स्पष्ट झाले आहे. या कराचा वापर जिल्हापरिषदेच्या शाळांच्या विकासासाठी करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते मॅकॅन्झी डाबरे यांनी आयुक्तांकडे केली आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे सरकार वाचवताना तत्कालीन आमदार हितेंद्र ठाकूर यांनी मुख्यमंतयापुढे तीन प्रस्ताव ठेवले होते. त्यात सूर्या पाणी पुरवठा योजना, जिल्हापरिषदेच्या शाळांचे नगरपालिकांकडे हस्तांतर आणि जिल्हापरिषदेचे आरोग्यकेंद्रे नगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याच्या मागणीचा समावेश होता. परंतु तीन मागण्यापैकी फक्त सूर्या पाणी पुरवठ्याची मागणी पूर्ण झाली पण इतर दोन मागण्या मात्र अजूनही प्रतीक्षेत आहेत. त्यानंतर महानगरपालिका आल्यावर तरी दोन्ही मागण्या पूर्ण होतील असे वाटले होते. परंतु ते अजूनही झाले नाही.

परंतु २०११ पासून महानगरपालिका शिक्षण कर मात्र वसुल करत आहे. आज पर्यंत हा कर ३०० कोटी पेक्षा जास्त वसूल झाल्याचे सामाजिक कार्यकर्ते मॅकेन्झी डाबरे यांनी केलेल्या माहिती अधिकारातून पुढे आला आहे. पालिकेत जमा होणाऱ्या ह्या शिक्षण कराचा जिल्हापरिषदेच्या शाळांच्या विकासाठी वापर करण्याची मागणी डाबरे यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे. या बाबत पालिका प्रशासनाकडे चौकशी केली असता सदरचा कर जमा केल्यावर शासनाकडे भरला जातो. असे सांगण्यात आले.

### बदलापूर नंतर अंबरनाथमध्ये
# टीओडी वीज मीटरला विरोध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ ता. २ (वार्ताहर) बदलापूरनंतर आता अंबरनाथमध्येसुद्धा टीओडी मीटरला विरोध होत आहे. टीओडी मीटरसाठी नागरिकांवर सक्ती केल्यास आंदोलनाचा इशारा काँग्रेसचे शहर अध्यक्ष कृष्णा रसाळ पाटील यांनी संबंधित प्रशासनाला दिला आहे.

भरमसाठ वाढलेल्या वीजबिलातून नागरिकांची सुटका होतच नाही, तर केंद्र सरकारच्या वतीने नवीन आरडीएसएस ही योजना सुरू करण्यात आली. वाढत्या मागणीप्रमाणे वीज वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठिंब्याने आरडीएसएस ही चार लाख कोटी रुपये खर्चाची योजना देशभर राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत अंबरनाथमध्येसुद्धा नागरिकांच्या घरी व रहिवासी सोसायटीमध्ये मीटर बदली करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र टीओडी मीटर लावताना नागरिकांची परवानगी न घेताच सक्तीने लावले जात आहे. यामुळे बदलापूरनंतर आता अंबरनाथमध्येसुद्धा याला विरोध होत आहे. दरम्यान, काँग्रेसचे शहराध्यक्ष कृष्णा रसाळ पाटील यांनी एमएसईडीसीएलला लेखी निवेदन दिले असून, टीओडी मीटरला विरोध केला आहे. ते लावण्यासाठी नागरिकांवर सक्ती होत असल्याने याच्या विरोधात शुक्रवारी (ता. ६) सकाळी ११ वाजता आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. आंदोलनात सहभागी होण्यासाठी नागरिकांना आवाहन केले आहे.



गोवेली ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच पुजा जाधव व त्याचे पती दिपक जाधव यांना कोलंबो विधापीठाची डॉंक्टरेट पदवी प्रदान,टिटवाळा/कल्याण तालुक्यातील गोवेली ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच पुजा जाधव यांच्या कामाची दखल घेण्यात आली आहे, तसेच त्याचे पती दिपक जाधव हयाच्या सामाजिक कार्याची दखल घेण्यात आली असून पती -पत्नीला कोलंबो विधापिठाने डॉंक्टरेट पदवी प्रदान करून गौरविण्यात आले आहे, त्या बदल कल्याण तालुक्यातुन शुभेच्छा देण्यात आल्या.

# आंबिवली परिसरात गटारांअभावी रस्त्यावर सांडपाणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

एकीकडे स्मार्ट सीटीचे स्वप्न दाखविनाऱ्या कल्याण डोम्बिवली महानगर पालिकेच्या अ/१ प्रभागक्षेत्रामधील वार्ड क्रमांक 7 अंबिवली रेल्वे स्टेशन जवलील एक नामांकीत डॉ चौधरी क्लिनिक येथे गटारी बनविल्या नसल्यामुळे गटारीचे सांड़पाणी रस्त्यावर वाहते, ग्रामपंचायत हद्दित देखील असे खड्डे अस्तित्वात नाहीत, परंतु महानगर पालिका असुन देखील दुर्दैवी अवस्था झाली असुन, गेले 30 वर्षात अनेक लोकसभा, विधानसभा, महानगरपालिका निवडणूकी पार पडल्या, परंतु इथे गटारी न बनल्यामूळे यंदा येथील रहिवासी यापुढे होणाऱ्या प्रत्येक निवडणूकित सामूहिक बहिष्कार टाकन्याच्या पवित्र्यात???


कल्याण डोंबिवली महानगरपालिका निर्माण होऊन आज 30 वर्षाचा कालावधी लोटला,परंतु या पंचक्रोशीत प्रसिध्द असलेल्या डॉ चौधरी क्लिनिक जवळ जो पायवाट रस्ता आहे तो अनेक वेळा बनविला परंतु या ठिकाणी घरातील सांडपाणी वाहून नेण्यासाठी ज्या गटारी बनविल्या हव्या होत्या त्या न बनल्याने येथे पूर्वी जसे आपल्याला ग्रामपंचायत काळात ज्या गावात जसे घराच्या बाहेर मोरी मधील गटारीचे सांडपाणी साठवून ठेवले जात होते त्यासाठी जसे खड्डे बनविले जात होते तसेच खड्डे महानगरपालिका हद्दीतील अ/१ प्रभागक्षेत्रातील वार्ड क्रमांक 7 आंबिवली गावठाण मधील वरील ठिकाणी गटारी बांधल्या नसल्याने खड्डे करावे लागतात व सदर सांडपाणी



नेहमी उपसा करावा लागत असुन त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली असून त्यामुळे साथीच्या रोगाची लागण लागण्याची दाट शक्यता असून,आता ग्रामपंचायत हद्दीतील गावात देखील असे खड्डे अस्तित्वात नाहीत परंतु आम्हाला स्मार्ट सीटीचे स्वप्न दाखविणाऱ्या कल्याण डोंबिवली मधील वार्ड क्रमांक 7 मधील आंबिवली गावठाण डॉ चौधरी क्लिनिक मध्ये असे गटारीचे सांडपाणी रस्त्यावर कसे वाहत आहे हें दिसत आहे

गेल्या 30 वर्षात आजपर्यंत जे खासदार आमदार नगरसेवक निवडुन गेले त्यांनी केवळ निवडणूकीच्या प्रचारात खोटी आश्वासन आम्हाला दिली, येथे पायवाट अनेक वेळा बनल्या परंतु इथे गटारीचि आवश्यकता आहे पण ही गंभीर समस्या सोडविन्यासाठी कुणालाही वेळ नाही,उघडी गटारी व त्यातील घान पाणी रसत्यावरुन वाहते अनेक लोक येथून सकाळी 4 ते रात्री 2 वाजेपर्यंत ये जा करत असतात,खापरी पाड़ा शिव नगर,संतोषी माता नगर,विराट बिल्डिंग, अटाली गांव परिसरातिल लोकांची ग़ैरसोय तर होतेच परंतु तिथे वास्तव्य करणाऱ्या व येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना त्यामुळे साथीच्या रोगाची लागन होऊन आता पावसाळ्यात ते आजारी पड़न्याची दाट शक्यता नाकारता येत नाही, आम्ही दर वेळी अनेक नगरसेवक आमदार खासदार निवडून दिले परंतु आमची ही गंभीर समस्या आज रोजीपर्यंत कुणीही सोडविली नाही. त्यामुळे आम्ही सर्वानी निश्चय केला आहे की जोपर्यंत ह्या गटारीचे काम पूर्ण होत नाही तो पर्यन्त येणाऱ्या प्रत्येक निवडणूकीवर आम्ही सामुहिक बहिष्कार टाकू अशी माहिती येथील नागरिकांच्या वतीने समाजसेवक व सोशल मीडिया आय टी सेल प्रमुख श्री दीपक सकपाळ यांनी दिली आहे





# पर्यावरण दक्षता मंडळातर्फे घरगुती परसबागेबाबत मार्गदर्शन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पर्यावरण दक्षता मंडळ ही स्वयंसेवी संस्था पर्यावरण शिक्षण, जनजागृती आणि संशोधन या क्षेत्रात २५ वर्षे कार्यरत आहे. ग्रीन लव्हर्स क्लब या उपक्रमात बागकामाचे विविध तंत्र आणि पद्धती असा कोर्स असून घरगुती बागेसंदर्भात मार्गदर्शन केले जाणार आहे.

२०१४ साली सुरु केलेला हा कोर्स गेली १० वर्षे यशस्वीपणे पर्यावरण दक्षता मंडळ ठाणे व डोंबिवली येथे राबवत आहे. जनसामान्यांमध्ये झाडांची वाढ आणि त्यांचे संवर्धन करण्याचे तंत्र विकसित व्हावे यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. सहा महिने माफक सशुल्क चालणाऱ्या या मार्गदर्शन वर्गाची सुरवात जून महिन्याच्या चौथ्या शनिवार पासून होणार आहे. या उपक्रमात कुंडीत रोप लावणे, किचन गार्डन, कोकेडमा, सक्युलंटस, झाडांना लागणाऱ्या किडी आणि त्यावर उपाय इत्यादी विषयांवर मार्गदर्शन वर्ग चालवण्यात येणार आहे. विविध सत्रांसोबत प्रात्यक्षिके, क्षेत्र भेटी, बाग भेटी इ. घेण्यात येणार आहेत. यावेळी तज्ञांचे थेट मार्गदर्शन आणि सत्राशेवटी आपल्या शंकांचे निरसन सुद्धा होणार असून या उपक्रमासाठी जागा मर्यादित असून पूर्वनोंदणी आवश्यक आहे. सहभाग निश्चितीसाठी आधी संपर्क करावा. ९५९४१७४६५३ / ९३७२३५८४५४

# कचरा संकलन शुल्क वाढ रद्द करा

## आ. सुलभा गायकवाड यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने मालपता करात कचरा संकलन करण्यासाठी आकारण्यात आलेल्या शुल्कात तब्बल ३०० रुपयांची केलेली वाढ रद्द करण्याची मागणी कल्याण पूर्व मतदार संघाच्या भाजपा आमदार सुलभा गायकवाड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने मालमत्ता करात घनकचरा व्यवस्थापन शुल्क हे ६०० रुपये वरून त्यात ३०० रुपये वाढ करून ९०० रुपये करण्यात आलेला आहे. महानगरपालिका क्षेत्रातील कचरा उचलणे व त्याचा शास्त्रोक्त पद्धतीने त्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी हि महानगरपालिकेची असून त्यासाठी महानगरपालिकेने प्रथम योग्य अशी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. महानगरपालिका क्षेत्रात अजूनही जागोजागी कचऱ्याचे मोठ्या प्रमाणात ठीग साचलेले नेहमी दिसुन येत आहेत.

राज्यातील इतर महानगरपालिकेच्या तुलनेत फक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये मालमत्ता कर जास्त प्रमाणात आकारला जातो त्याच्या तुलनेत नागरीकांना कोणत्याही मुलभुत सुविधा मिळत नाहीत. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील नागरिकांवर अन्यायकारक रित्या लादलेल्या करामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये महानगरपालिका प्रशासना विरोधात तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे व याचा उद्रेक केव्हाही होवु शकतो.

तरी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने मालमत्ता करात कचरा संकलन करण्यासाठी आकारण्यात आलेल्या शुल्कात तब्बल ३००/- ची केलेली वाढ रद्द करण्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनास प्राधान्याने आदेश देण्याची मागणी भाजपा आमदार सुलभा गायकवाड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# ठाणे महानगरपालिकेची सर्वंकष स्वच्छता मोहीम





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेनुसार ठाणे महानगरपालिकेने ०३ आणि ०४ जून रोजी संपूर्ण घोडबंदर रस्त्यावर सर्वंकष स्वच्छता मोहीम (Deep Clean Drive) हाती घेतली आहे. मुख्य रस्ता, सेवा रस्ता, दुभाजक, चौक अशा सर्व ठिकाणी ही मोहीम राबवण्यात येत आहे. मंगळवारी सकाळी या मोहिमेस सुरूवात झाली. बुधवारी सकाळीही मोहीम सुरू राहणार आहे.

### चार भागात रस्त्याच्या सफाईचे नियोजन

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार, माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत घोडबंदर रोडवर दुर्तफा सर्वंकष स्वच्छता मोहिमेचे (Deep Clean Drive) नियोजन करण्यात आले. कापूरबावडी ते पातलीपाडा, पातलीपाडा ते हायपर सिटी, हायपर सिटी ते नागला बंदर, नागला बंदर ते गायमुख असे या रस्त्याचे चार विभाग करण्यात आले असून त्या प्रत्येक विभागासाठी समन्वयक अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे. प्रत्येक विभागासाठी समन्वयक अधिकाऱ्यासोबत सहाय्यक आयुक्त, आरोग्य अधिकारी, कार्यकारी अभियंता, उप अभियंता, उपमुख्य स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक, कनिष्ठ अभियंता आणि स्वच्छता कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संपूर्ण घोडबंदर रोडच्या स्वच्छतेवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. या मोहिमेत, मुख्य रस्ता, सेवा रस्ता, दुभाजक या ठिकाणी कचरा काढणे, डेब्रिज उचलणे, दुभाजक स्वच्छ करणे, नाले आणि गटारातील गाळ उचलणे, रस्त्याची साइडपट्टी स्वच्छ करणे, झाडांच्या कापलेल्या फांद्या उचलणे आदी कामे करण्यात येत आहेत. मोठ्या प्रमाणावर अधिकारी आणि कर्मचारी त्यात सहभागी झाले असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी दिली.

### ५०० सफाई कामगारांचा सहभाग

या मोहिमेत महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासोबत, उद्यान विभाग,सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रभाग समिती, एमएमआरडीए, एमएसआरडीसी, मेट्रो यांनीही सहभाग घेतला आहे. सुमारे ५०० सफाई कामगार, १५ डम्पर, यांत्रिक सफाईच्या दोन्ही मशीन्स यांच्या मदतीने ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. उपायुक्त मनीष जोशी आणि दिनेश तायडे, उपनगर अभियंता विकास ढोले आणि सुधीर गायकवाड यांच्यावर समन्वयाची जबाबदारी असून आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त सोनल काळे यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी त्यांना नेमून दिलेल्या विभागातील सर्वंकष स्वच्छता अभियानात सहभागी झाले आहेत.

# पाचगणीत गतका प्रशिक्षण शिबीर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : असोसिएशन ऑफ गतका, महाराष्ट्र आणि सातारा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने खेळाच्या खेलो इंडिया पदक प्राप्तीनंतर पुढील वर्षासाठी खेळाडू नवीन नियमाप्रमाणे टेक्निक प्रमाणे तयार व्हावेत यासाठी पाचगणी येथील हिल रेंज या निवासी शाळेत राज्यस्तरीय उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिरामध्ये महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून 55 ते 60 खेळाडूंनी सहभाग नोंदवला आणि शिबिरा करिता प्रशिक्षक म्हणून गतका फेडरेशन ऑफ इंडिया यांच्याकडून इंडिया टेक्निकल डायरेक्टर मनविंदर सिंग आणि ऑफिशियल सबरजीत सिंग हे उपस्थित होते. शिबिराच्या सांगता समारोहाला सातारा जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन ताराळकर तसेच हिल रेंज एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका डॉ. तेजस्विनी भिलारे, असोसिएशन ऑफ गतका महाराष्ट्राच्या सचिव प्रा.आरती चौधरी आणि विविध जिल्ह्यांचे जिल्हा प्रतिनिधी उपस्थित होते.






# जलपर्णीपासून परिवर्तनाची दिशा

## ‘वीड टू वेल्थ’ प्रकल्पाची मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केली पाहणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (UMED) अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील वरप, ता. कल्याण येथे नाविन्यपूर्ण निरुपयोगी जलपर्णी पासून उपयुक्त हस्तकला प्रशिक्षण व रोजगार निर्मिती प्रकल्प ‘वीड टू वेल्थ’ अजय बहुउद्देशीय संस्था यांच्या मदतीने राबविण्यात येत आहे.

या प्रकल्पास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वी.योजना छायादेवी शिसोदे यांनी सदिच्छा भेट दिली. या वेळी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधण्यात आला व महिलांनी तयार केलेल्या वस्तूंची पाहणी करून त्यांचे कौतुक करण्यात आले.

यावेळी बोलताना रोहन घुगे म्हणाले, "समाजोपयोगी व संसार उपयोगी वस्तू बनविण्याची कल्पना सुचली आणि आज, महिलांना हा जगण्याचा मार्ग मिळाला आहे. महिलांना स्वबळावर उभं करण्यासाठी हा रोजगार अत्यंत महत्त्वाचा आहे." ते पुढे म्हणाले, "आपण तयार करत असलेल्या वस्तूंना बाजारपेठेत चांगली मागणी आहे. आपल्याकडे जलपर्णीचा कच्चा माल मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे, आणि तुम्हीच पुढाकार घेऊन या कामाला उंचावर घेऊन जाणार आहात. त्यामुळे भविष्यात आपले जीवन सुखकर आणि संपन्न होईल याची खात्री आहे."

प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे म्हणाल्या, "हे सर्व जणू स्वप्नवत वाटते. याआधी जलपर्णीविषयी अनेक उच्चस्तरीय बैठकांचे आयोजन झाले, पण त्याचे पुढे काही घडले नाही. मात्र जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने व पुढाकारामुळे हा प्रश्न मार्गी लागला आणि आज आपण त्याचे यशस्वी रूप प्रत्यक्ष पाहत आहोत. महिलांचा वाढता सहभाग आणि सकारात्मक प्रतिसाद पाहून अत्यंत समाधान वाटते."

गट विकास अधिकारी (पंचायत समिती, कल्याण) संजय भोये, गट विकास अधिकारी (पं. स. अंबरनाथ) पंडित राठोड, सहाय्यक गट विकास अधिकारी (पं. स. कल्याण) रघुनाथ गवारी, विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पं. स. कल्याण पराग भोसले, विस्तार अधिकारी, उमेद, जिल्हा अभियान व्यवस्थापक (DMM), ठाणे सारिका भोसले, तसेच BMM, BM, CC स्टाफ, कल्याण व अंबरनाथ व बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे महिलांना स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत असून त्यांच्यात उद्योजकता विकसित होण्यास मदत होत आहे. हा प्रकल्प केवळ उपजीविकेचा नव्हे, तर स्वाभिमानाचा आणि सशक्तीकरणाचा मार्ग बनला आहे असे मत जय शिवराय स्वयं सहायता समूहाचे (म्हारळ) वर्षा शिरसाठ यांनी व्यक्त केले.

# ‘बीट प्लास्टिक पोल्यूशन’ विषयावर संत निरंकारी मिशनचे अभियान

## देशभरातील १८ तर महाराष्ट्रातील ६ पर्यटन स्थळांचा समावेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या लोकमंगलकारी व दूरदर्शी नेतृत्वाखाली संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन संयुक्त राष्ट्रांकडून निर्धारित थीम ‘बीट प्लास्टिक पोल्यूशन’ ला केंद्रीभूत मानून देशभरातील 18 प्रमुख पर्वतीय पर्यटन स्थळांवर 5 जून रोजी सकाळी 8 ते दुपारी 2 या वेळात एक व्यापक वृक्षारोपण व स्वच्छता अभियान आयोजित करत आहे.

संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे सचिव जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले, की निरंकारी मिशन सन 2014 पासूनच संयुक्त राष्ट्रांच्या ‘युनाईटेड नेशन एन्व्हायरनमेंट प्रोग्राम‘ या पर्यावरण कार्यक्रमाच्या थीमवर ‘विश्व पर्यावरण दिवस’ आयोजित करत आहे. हे केवळ एका दिवसाचे आयोजन नसून एक सतत जनचेतना अभियान आहे जे प्रकृती आणि मानवता यांच्यातील सौहार्दपूर्ण संबंधांना पुन्हा सशक्त करते.

या महाअभियाना अंतर्गत देशातील प्राकृतिक सौंदर्याने नटलेल्या विविध 18 प्रमुख पर्वतीय व पर्यटन स्थळांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील महाबळेश्वर, पांचगणी, खंडाळा, लोनावळा, पन्हाळा व सोमेश्वर; उत्तराखंडमधील मसूरी, ऋषिकेश, लेन्सडाउन, नैनीताल, चकराता व भवाली; हिमाचल प्रदेशातील सिमला, मनाली आणि धर्मशाला; गुजरातमधील सापुतारा; सिक्किममधील गीजिंग आणि कर्नाटकातील सुरम्य नंदी हिल्स उल्लेखनीय आहेत. ही स्थळे केवळ प्रकतीच्या कुशीत वसलेली आहेत असे नसून पर्यावरण जागृतीच्या बाबतीत असे केंद्रबिंदू बनत आहेत जिथे निष्काम सेवा आणि सहभाग एकत्रितपणे साकार होत आहे.

या प्रसंगी मिशनचे स्वयंसेवक, सेवादल सदस्य, भक्तगण व स्थानिक नागरिक एकोप्याने प्रार्थनेत सहभागी होऊन कार्यक्रमाची सुरवात करतील. त्यानंतर युवा स्वयंसेवक पथनाट्ये, सांस्कृतिक प्रस्तुती आणि रचनात्मक संदेशाच्या माध्यमातून प्लास्टिक प्रदूषणाचा दुष्प्रभाव आणि त्यावरील उपाययोजना यावर जनजागृती करतील. शिवाय, पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारे फलक व बॅनर हातात घेऊन मानवी साखळी तयार करुन यावेळी समाजाला प्रेरणा दिली जाणार आहे.

# मुरबाड पंचायत समिती मार्फत भात बियाणे वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(बाळासाहेब भालेराव) : २ जून २०२५ रोजी मुरबाड पंचायत समिती मार्फत ५०% अनुदानाने भात बियाणे मुरबाड.गटविकास अधिकारी डॉ.लता गायकवाड, सहायक. गटविकास अधिकारी चिंतामण लोहकरे, कृषी विस्तार अधिकारी रवींद्र चौधरी यांचे हस्ते शेतकऱ्यांना भात बियाणे वाटप करण्यात आले आहे.

यावेळी पंचायत समिती खातेनिहाय अधिकारी,व कर्मचारी उपस्थित होते. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ५०% अनुदानाने मिळणाऱ्या भात बियाणे यांचा लाभ घ्यावा असे आव्हान मुरबाड पंचायत समिती मार्फत करण्यात आले आहे.

## नवजीवन लोकविकास संस्था व टेक महिंद्रा फाउंडेशन तर्फे

# रोजगार प्रशिक्षण केंद्र



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : टेक महिंद्रा फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्यातून नवजीवन लोकविकास संस्था द्वारे बदलापूर शहरात स्मार्ट सेंटरचे उद्घाटन करण्यात आले त्यावेळी त्या ठिकाणी युवकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. उद्घाटन डॉ. नैमा उरूज(मॅनेजर टेक महिंद्रा फाउंडेशन) यांच्याद्वारे करण्यात आले. त्यांच्यासोबत टेक महिंद्रा फाउंडेशनचे चंद्रकांत सामुद्रे व खुशबू सहभागी झाले होते. अतिशय भव्य दिव्य असे प्रशिक्षण केंद्र पाहून त्यांनी सांगितले की बदलापूर शहरातील बेरोजगार युवकांना या ठिकाणी मोफत प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करण्यात येईल. बदलापूर शहरात शहरीकरण व बेरोजगारीकरण मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे स्मार्ट सेंटरची या ठिकाणी अतिशय गरज आहे. असे त्यांनी बोलून दाखवले. नवजीवन लोकविकास संस्थेचे अध्यक्ष किशोर पाटील यांनी सांगितले की या ठिकाणी विशेष प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध झाल्यामुळे त्याचा जास्तीत जास्त युवकांनी फायदा घ्यावा व योग्य त्या ठिकाणी रोजगार उपलब्ध करून त्यांना रोजगार देण्यात येणार आतापर्यंत संस्थेद्वारे हजारो युवकांना रोजगार देण्यात आला असून कल्याण ,मुंब्रा ,ठाणे, मुंबई व पुणे ठिकाणी संस्थेचे स्मार्ट सेंटर स्थापन करण्यात आले असून त्याच धर्तीवर बदलापूर शहरात देखील केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. युवकांना प्रवास खर्च वाचावा म्हणून रेल्वे स्टेशनच्या जवळच सेंटरची स्थापना करण्यात आली त्यामुळे जवळपासच्या खेड्यातील युवकांना देखील त्याचा जास्तीत जास्त फायदा घेण्यात येईल कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रशिक्षित युवकांना सर्टिफिकेट वाटत करण्यात आले. तसेच युवकांनी त्यांच्या कलागुण(सांस्कृतिक कार्यक्रम)देखील सादर केले कार्यक्रमांमध्ये ज्या युवकांना नोकरी उपलब्ध झाली आहे. त्यांनी त्यांचे अनुभव देखील कार्यक्रमात सादर केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे देवेश सपकाळे, सागर उंडे, करुणा, साहिल, वर्षा, सदफ, दामिनी, सोनाली, आशालता यांनी मेहनत केले आभार प्रदर्शन ममता कोंडा यांनी केले.

# ‘प्लास्टिकमुक्त नवी मुंबई’ एक उपक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : प्लास्टिकमुक्त नवी मुंबई’ हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्वत:पासूनच सुरुवात करीत महापालिका मुख्यालयासह आपली कार्यालये एकल वापर प्लास्टिकमुक्त करण्यावर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली भर दिला आहे. या अनुषंगाने नागरिकांमध्येही प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबविण्याबाबत सातत्याने जनजागृती करण्यात येत असून प्रतिबंधात्मक प्लास्टिक विरोधातील मोहीमा प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. प्रतिबंधात्मक प्लास्टिक मोहीमेला गती मिळावी या दृष्टीने प्रोजेक्ट मुंबई या स्वयंसेवी संस्थेशी नवी मुंबई महानगरपालिकेचा सामंजस्य करार (MOU) झालेला असून ‘नवी मुंबई प्लास्टिक आणि ई-वेस्ट रिसायक्लोथॉन’ चा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. याव्दारे नवी मुंबईतील घराघरातून एकल वापर प्लास्टिकला हद्दपार करण्यासाठी ठोस काम केले जाणार आहे.









# गृहनिर्माण संस्थांसाठी मार्गदर्शन शिबीर संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ग्राहक संरक्षण कक्ष ठाणे जिल्हा ग्रामीण तर्फे आयोजित कम्युनिकेशन स्किल डेव्हलपमेंट आणि गृहनिर्माण संस्थांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर रविवारी संपन्न झाले. या शिबिरामध्ये 100 ते 150 सोसायटी च्या पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ग्राहक संरक्षण कक्षा चे ठाणे जिल्हा ग्रामीण संघटक प्रथमेश पुण्यर्थी यांनी हे शिबीर आयोजित केले होते. या शिबिरात प्रमुख वक्ते डॉ. सिद्धार्थ मोरे प्रादेशिक संचालक श्रम व रोजगार मंत्रालय भारत सरकार यांनी कम्युनिकेशन स्किल डेव्हलपमेंट वर अत्यंत सुंदर प्रकारे विषय सादर केला.

प्रमुख वक्ते कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेचे अध्यक्ष ॲडव्होकेट प्रकाश जगताप यांनी गृहनिर्माण संस्थेतील, त्यातील सभासदांना येणाऱ्या विविध प्रश्न, अडचणी सादर करून विविध प्रश्नांना योग्य ती उत्तरे दिली. सरते शेवटी त्यांनी ग्राहक संरक्षण कक्षासाठी एक पंधरा-वीस वकिलांचे पॅनल बनवण्याचा सल्ला देऊन त्यासाठी निस्वार्थ सेवा देण्याचे आश्वासन देऊन त्यासंदर्भात कसे आणि कशाप्रकारे नियोजन करावे याचे सर्व अधिकार प्रथमेश पुण्यार्थी यांना दिले.

प्रमुख वक्ते सल्लागार राजन शुल्क या शिबिरात असोसिएशनचे संस्थापक व गृहनिर्माण संस्था पुनर्विकास प्रकल्प म्हणजे प्रोजेक्ट मॅनेजमेंट पीएमसीचे यांनीही डेव्हलपमेंट, कस्टर्ड प्रोजेक्ट याविषयी सखोल माहिती दिली. सध्या रीडेव्हलपमेंटचा धुमाकूळ सर्वदूर पोहोचला आहे तो आपण बिल्डरला देणे अथवा स्वतःही डेव्हलपमेंट करणे या दोन्ही बाबतीतील एडवांटेजेस व डिसॲडवांटेज म्हणजे त्या संदर्भातील फायदे आणि तोटे समजावून सांगितले. उपस्थित ग्राहकांना म्हणजे फ्लॅट धारकांना जे प्रश्न उद्भवत होते त्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. या कार्यक्रमाला ग्राहक संरक्षण कक्ष महाराष्ट्र राज्य कार्यकारणी सचिव राजेश कुचिक, खजिनदार देविदास माडये, कार्यकारणी सदस्य बबन सपकाळ, सदानंद घोसाळकर, मिरा भाईंदर कक्ष जिल्हा संघटक सुभाष केसरकर, शिवसेना महिला जिल्हा संघटक रेखा कंठे, उपशहर प्रमुख प्रदीप साळवी, राजु दीक्षित, माजी नगरसेवक दशरथ तरे, विधानसभा संघटक सुजाता धारगळकर, बदलापूर शहर प्रमुख किशोर पाटील, उप विधानसभा संघटक रूपेश भोईर, विभाग प्रमुख सतिश वायचळ, निलेश भोर उपस्थित होते.

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024